मी उंच उंच! ५

९

सकाळ

साई सुदर्शन १२



NIE Website

अंकासाठी संपर्क 98815 98815

पुणे, शुक्रवार, २३ मे २०२५ ■ पाने १२ किंमत ₹ ६

NIE NEWSPAPER IN EDUCATION

गंगेतील ‘डॉल्फिन’ला हवे ‘जीवन’दान

दोस्तांनो, गंगा नदीतील ‘डॉल्फिन’च्या अस्तित्वाला नदीतील वाढत्या विषारी रसायनांच्या प्रदूषणामुळे गंभीर धोका निर्माण झाल्याची बातमी तुम्ही वाचली असेलच. जलप्रदूषण आणि त्यामुळे जलचरांच्या अस्तित्वाला निर्माण होणारा धोका यात आता ‘डॉल्फिन’चीही भर पडली आहे. यावर वेळीच उपाययोजना न झाल्यास डॉल्फिन नामशेष होण्याचीही भीती व्यक्त केली जात आहे. याबाबत अधिक जाणून घेऊया...

गंगेच्या गोड्या पाण्यातील डॉल्फिन

संशोधन काय सांगते?

- ‘वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया’च्या संशोधनातून ही बाब समोर आली आहे. प्रख्यात विज्ञानपत्रिका ‘हलिऑन’ यात प्रकाशित झालेल्या या अभ्यासानुसार, गंगेच्या गोड्या पाण्यातील सस्तन प्राण्यांच्या अन्नसाखळीतून या डॉल्फिनला अत्यंत हानिकारक अशा ‘एन्डोक्राइन डिसरप्टिंग केमिकल्स’चा (ईडीसी) भयानक मारा सहन करावा लागत आहे. संशोधकांनी गंगेतील डॉल्फिनचे खाद्य असलेल्या विविध मासळी प्रजातींमधून ३९ प्रकारच्या ‘ईडीसी’ रसायनांचे प्रमाण तपासले. यात विविध रसायने आढळून आली असून, त्यांच्यापासून डॉल्फिनला धोका निर्माण झाला आहे.

घातक रसायने

- डाय इथाइलमेक्सिल, थॅलेट (डीईएचपी) आणि डाय-एन-ब्यूटिल थॅलेट (डीएनबीपी) या औद्योगिक रसायनांची जीवसाखळीतील जलचरांत मोठ्या प्रमाणात साठवण (बायो ॲक्युमलेशन) होत असल्याचे निष्पन्न झाले आहे. विशेष म्हणजे, डीडीटी व लिंडेन यांसारख्या बंदी घातलेल्या कीटकनाशकांचे अंशही या जलचरात सापडले आहेत.

खाऱ्या पाण्यातील डॉल्फिन

संख्येत मोठी घट

- गंगेतील डॉल्फिनची संख्या १९५७ पासून आजपर्यंत ५० टक्क्यांहून अधिक घटली असून, त्यांचा अधिवास जवळपास चतुर्थांशाने कमी झाला आहे.
- या दुर्मीळ प्रजातीला भारताचे ‘राष्ट्रीय जलचर’ म्हणून मान्यता प्राप्त असूनही त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.
- जगभरात केवळ पाच प्रजातींच्या नदीतील डॉल्फिन अस्तित्वात असून, ते सर्वच संकटग्रस्त श्रेणीत आहेत.
- जर परिस्थिती अशीच राहिली, तर चीनमधील यांग्त्से नदीत नामशेष झालेल्या बायजी डॉल्फिनप्रमाणेच भारतातील गंगेतील डॉल्फिन धोक्यात येतील.

प्रदूषणाची कारणे व परिणाम

- शेतीमधून होणारी रसायनयुक्त मातीची धूप, वस्त्रोद्योगातील रासायनिक सांडपाण्याचे थेट नदीत मिसळणे, वाहनांमधून होणारे प्रदूषण, निकृष्ट घनकचरा व्यवस्थापन अन् पर्यटकांची गर्दी वाढल्याने होणारा कचरा ही जलप्रदूषणाची प्रमुख कारणे आहेत.
- ‘ईडीसी’ प्रकारातील रसायनांचे दुष्परिणाम गंभीर आहेत. ही रसायने सस्तन प्राण्यांच्या हार्मोन प्रणालीत आणि प्रजननक्षमतेत बाधा निर्माण करतात. शिवाय ती अनेक वर्षांपर्यंत पर्यावरणात टिकून राहतात. डीईएचपी, डीएनबीपी, डीडीटी, आर्सेनिक, पारा, कॅडमियम, आणि पॉलीक्लोरीनेटेड बायफिनाइल्स या सात रसायनांचा धोका मोठ्या प्रमाणावर असतो.

तुम्हाला माहितीये का?

- केंद्र सरकारने १८ मे २००९ रोजी गंगा डॉल्फिनला भारताचा ‘राष्ट्रीय जलचर प्राणी’ म्हणून घोषित केले आहे.
- गंगा नदीतील डॉल्फिन (Platanista gangetica) आणि सिंधू नदीतील डॉल्फिन (Platanista gangetica minor) या डॉल्फिनच्या गोड्या पाण्यातील दोन प्रजाती आहेत. या प्रजाती प्रामुख्याने भारत, बांगलादेश, नेपाळ आणि पाकिस्तानमध्ये आढळतात.
- गंगा नदीत आढळणारा डॉल्फिन हा अंध जलचर प्राणी असून, त्याची वास घेण्याची क्षमता खूप तीक्ष्ण आहे. या प्रजातीची संख्या आता भारतात २०००पेक्षा कमी झाली आहे.
- केंद्र सरकारने १९७२च्या भारतीय वन्यजीव संरक्षण कायद्याच्या कक्षेत गंगा डॉल्फिनचाही समावेश केला आहे. ‘मिशन क्लीन गंगा’चे एक उद्दिष्ट डॉल्फिनला वाचवणे हेही आहे.
- या डॉल्फिनची शिकार काही लोक त्यांच्याकडून मिळणाऱ्या तेलासाठी करतात. सध्या उत्तर प्रदेशातील नरोरा आणि पटना साहिब, भागलपूरपासून बिहारमधील सुलतानगंजपर्यंत गंगा डॉल्फिन आढळतात.
- ज्या प्रमाणे वाघ हा जंगलाच्या आरोग्याचे प्रतीक, त्याचप्रमाणे डॉल्फिन हा गंगा नदीच्या आरोग्याचे प्रतीक मानला जातो.

पोशिंदा

मी शेतकरी शेतकरी
जग 'राजा' म्हणे सारी
करी जीवाची हेटाळणी
गोष्ट आहे ना ही खरी.....?

माझा तुटका संसार
माझं फाटकं हो घर!
माझ्या झोपडीला न लाभे
पंख्या-कुलरचं हो वारं!

कांदा, मिरची, भाकर
माझं हो खाद्य भांडार
श्रीमंत पंचपक्वानाला
कुठे दिसे गरिबाचे दार!

कधी पायाला न लाभे
बूट, चपलांचं वरदान...
माझे अनवाणी पाय
त्याला काट्याकुट्याचं दान!

जशी भेगाळती माती
तशी तुटे नातीगोती
सारा संसार पैशाचा
आमची रिकामीच पोती!

माझ्या लेकराबाळाला
उघडं रान शिकवी शाळा
माझ्या जीवनसंगिनीला
बळ देई माझा मळा!

असा दुःखी हो संसार
त्याला अंत नाही पार
तुमची दुखावर फुंकर
राजा म्हणती जगभर!

- दामोधर मोरे, शिक्षक, घाटनांद्रा, ता. सिल्लोड, छत्रपती संभाजीनगर



काश्मीर- पृथ्वीवरचा स्वर्ग

आपल्या भारतात अनेक सुंदर पर्यटनस्थळे आहेत. तेथे फिरायला जाऊन आपण जीवनाचा खरा आनंद मिळवू शकतो. परंतु, मी पाहिलेल्या पर्यटन स्थळांपैकी माझे आवडते ठिकाण काश्मीर आहे. मी मागील वर्षी आई-वडिलांसोबत काश्मीरला गेलो होतो. त्या वेळी पृथ्वीवरचे हे स्वर्गीय सौंदर्य पाहून मी थक्क झालो. कोणी तरी म्हटले आहे, की काश्मीर भारताचे स्वित्झर्लंड आहे. तेथे गेल्यावर मला ही गोष्ट जाणवली आणि पटलीसुद्धा. खरोखर काश्मीर जगातील सर्वाधिक मोहक आणि रमणीय स्थळ आहे. हे विशाल स्थान हिमालयाच्या मध्यात स्थित आहे. तिथे विपुल प्रमाणात फळे-फुले, वनस्पती आणि जीवजंतू आढळतात.

याशिवाय येथे अनेक ऐतिहासिक स्मारके, सुंदर चित्राप्रमाणे दिसणारी स्थळे, रम्य दृश्ये व हिरवीगार जंगले आहेत. येथील नागमोडी वळणाच्या नद्या, मोठमोठे तलाव, विशाल झरे, बर्फाने झाकलेले पर्वत, सुरूचे वृक्ष व सुंदर बगीचे काश्मीरच्या सौंदर्यात अधिकच भर करतात. निशातबाग, चंदनबारी, अनंतनाग, चष्मेशाही, नागीन लेक व शालिमार बाग ही येथील प्रसिद्ध स्थळे आहेत.

येथील विशाल धबधब्यांतून पडणारे पाणी मधुर संगीत निर्माण करते. येथे भगवान शंकराचे प्राचीन मंदिर आहे. अमरनाथ मंदिर धरतीपासून पंधरा हजार फूट उंचीवर आहे. याशिवाय काश्मीरमध्ये धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व असलेली अनेक तीर्थस्थळे आहेत. दरवर्षी हजारो पर्यटक या प्राचीन व धार्मिक स्थळांची यात्रा करतात. काश्मीर भारतातील सर्वाधिक सुंदर नैसर्गिक स्थळांपैकी एक आहे. काश्मीरचा संपूर्ण भाग रमणीय आहे. म्हणूनच दरवर्षी भारतासह विदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक येथे येतात. मला आमची ही ट्रीप खूप आवडली होती! लवकरच तेथील परिस्थिती आधीसारखी होईल अशी आशा आपण करूया!

- सारंग चव्हाण, नाशिक



माझा आवडता ऋतू-पावसाळा

दोस्तांनो, तुम्हाला हे माहीत आहे का, की सर्वांत जास्त कोणत्या ऋतूला महत्त्व असते? तुम्ही अगदी बरोबर ओळखलंत. तो ऋतू म्हणजे पावसाळा! मला पावसाळा ऋतू खूप आवडतो. या ऋतूत कोसळणाऱ्या पावसाच्या धारांमध्ये भिजणे ही प्रत्येकाची आवडती गोष्ट असते, होय ना? पण पावसात जास्त वेळा भिजल्याने आपण आजारी पडतो. आपण जर पावसाळ्यातलं वातावरण पाहिलं, तर ते खूप स्वच्छ आणि सुंदर दिसतं. सगळं काही धुऊन निघाल्यासारखं एकदम नवं नवं वाटत असतं. वसुंधरेने स्वतःवर हिरवी शाल पांघरली आहे असं वाटतं.

अतिशय सुंदर वातावरण या ऋतूत आपल्याला दिसतं. कधी कधी अशीही गंमत होते, की ज्या दिवशी अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवल्याने शाळीला सुट्टी जाहीर केलेली असते, नेमका त्याच दिवशी पाऊस पडत नाही. याउलट एखाद्या दिवशी आपण छत्री न घेता बाहेर जातो आणि त्याच दिवशी खूप पाऊस पडतो. पावसाळ्यात अशी मजा खूपदा अनुभवायला मिळते.

पावसाळ्यात जर गड-किल्ले पाहायला गेलो, तर तिकडचा निसर्ग खूप सुंदर दिसतो. जंगलात मोरांसह विविध पक्षी दिसतात. हे सर्व मला खूप आवडतं आणि त्यामुळेच मला सर्व ऋतूंमध्ये पावसाळा खूप आवडतो. तुम्हालाही आवडतो ना?

- क्रिशी महाले, सातवी, नूतन मराठी विद्यालय, नेरूळ, नवी मुंबई

प्रसाद मोटे, न्यू लिटिल बर्ड नॅशनल इंग्लिश स्कूल, छत्रपती संभाजीनगर.

अंशुमन कांगळे, आर्यन पब्लिक स्कूल, नऱ्हे, पुणे

ओमराज कटारे, भोंडवे पब्लिक स्कूल बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर



गायत्री माने, सहावी विश्वकर्मा विद्यालय मराठी प्राथमिक, पुणे.



श्रवण कड, पाचवी, श्री दादा महाराज नाटेकर पंचकोशाधारित गुरुकुल विद्यालय, चिखली, पुणे.

अस्मिता भालेराव, आठवी, प्रियदर्शिनी पब्लिक स्कूल, भिंगार, अहिल्यानगर

? २ शालिमार बाग, अनंतनाग ही ठिकाणे कुठे आहेत?

✓ ४ जगात सर्वाधिक लांब उडी मारणाऱ्या मांजराचे नाव ऑस्कर आहे.

‘थोडं टाकलं ताटात तर काय झालं?...’

इंद्रजीत आणि सुपर्णा बहीणभाऊ. इंद्रजीत सातवीत, तर सुपर्णा पाचवीत. इंद्रजीत आता नवीन वर्षात आठवीत जाणार असल्याने ‘मी मोठा झालोय,’ अशा टेचात वावरायचा. पण रोज जेवताना मात्र हा खरोखरच ‘मोठा’ झालाय का, असा प्रश्न आई-बाबांना पडायचा! आज बघूया त्याची गोष्ट.

ताट चाटूनपुसून स्वच्छ

छोटी सुपर्णा जेवताना तिला वाढलेली भाजी आई-बाबा रागावण्याच्या भीतीनं का होईना, पण गुपचुप खायची. भात-पोळी, जे काही तिनं वाढून घेतलं असेल, ते संपवायची. जेवणाच्या शेवटी तिचं ताट चाटूनपुसून स्वच्छ केल्यासारखं दिसायचंच, पण शाळेचा डबाही रोज पूर्ण संपवलेला असायचा. इंद्रजीत याच्या अगदी उलट! जवळपास सगळ्याच भाज्या त्याच्या नावडीच्या. त्यामुळे डब्यात नेहमी भाजी उरून संध्याकाळी डबा उघडेपर्यंत ती खराब झालेली असायची. जेवणाच्या शेवटी ताटात पोळीचा तुकडा, थोडा भात, असं काही ना काही उरलेलं असायचं. “मला हे जास्त झालंय!” असं म्हणून तो उठू लागायचा आणि आई ओरडायची. “तो भात कशाला टाकलास? कोंबडीची दहा पिल्लं जेवतील त्यात!” असं म्हणून आई सक्तीने त्याला ते खायला लावायची. रोज जेवताना आईबरोबर त्याची शाब्दिक खडाजंगी ठरलेली.

मोह नडला

इंद्रजीत आणि सुपर्णाच्या आजोबांचा ऐंशीवा वाढदिवस होता. वाढदिवसाच्या पार्टीला आजोबांचा आवडता, ‘हेल्थी’ पद्धतीनं बनवलेला पास्ता केला होता. इंद्रजीतनं जेवायला बसल्यावर मुबलक पास्ता वाढून घेतला. दोन डाव, तीन डाव, चार डाव... जेवायला बसलेले सगळे त्याच्याकडे बघायला लागले. बाबा म्हणालेसुद्धा, “अरे, किती वाढून घेतोयस! संपणार आहे का तुला?” प्लेटमध्ये पास्त्याचा डोंगर वाढून घेतल्यावरच इंद्रजीत थांबला आणि शांतपणे खाऊ लागला. आई-बाबांना मात्र शरमेने नको नको झालं होतं! अर्थात इंद्रजीतचा पास्त्याचा उत्साह काही वेळातच मावळला. एवढा पास्ता एकट्याने संपवणं शक्यच नव्हतं. हळूहळू त्याचा खाण्याचा वेग मंदावला. प्लेटमध्ये चांगला दीड-दोन वाट्या पास्ता उरलेला असताना तो जेवणावरून उठला. “हा पास्ता मला जात नाहीये. उरलेला टाकून देतो,” असं म्हणत डस्टबिनकडे जाऊ लागला. तेव्हा मात्र आजोबांनी त्याला थांबवलं.

चालणार नाही!

आजोबा म्हणाले, “इंद्रजीत, तू पास्ता वाढून घेतलास तेव्हाच आम्हा सगळ्यांना कळलं होतं, की तू एवढा पास्ता संपवू शकणार नाहीयेस. पण मी मुद्दाम काही बोललो नाही. आता ऐक- हा सगळा पास्ता तूच खायचा आहेस. मी तुला तो डब्यात भरून देईन. उद्या सकाळी नाश्त्याला खा. पण तो टाकायचा नाही.”

इंद्रजीतने कुरकुर सुरू केली. “पण एवढं काय झालं त्यात? आईसुद्धा घरी अशीच कटकट करते रोज! थोडंसं अन्न गेलं वाया तर एवढं काय बिघडलं?... तुम्ही सगळे जाम बोरिंग आहात!”

आजोबा म्हणाले, “इंद्रजीत, जेव्हा तू ताटात वाटीभर पास्ता, पोळीचा तुकडा, दोन घास भात हे अन्न टाकतोस तेव्हा हे सर्व अन्न मुळात येतं कुठून याचा विचार करतोस का?... निसर्ग पाऊस देतो आणि शेतं हिरवीगार करतो. शेतकरी घाम गाळून शेत पिकवतो. आई-बाबा मेहनतीनं पैसे मिळवतात आणि अन्नधान्य विकत आणतात. घरात स्वयंपाक करणं हेही मोठं कष्टाचं काम आहे. तू जेव्हा ‘थोडं अन्न टाकलं, तर काय झालं?’ म्हणतोस, तेव्हा तू या सगळ्यांचा अपमान करत असतोस बाळा! अरे, आपल्याला रोज पौष्टिक जेवण मिळतंय, म्हणून देवबाप्पाचे आभार मानायचे, की अन्न वाया घालवायचं?...” इंद्रजीतनं हे ऐकता ऐकता सुपर्णासकट इतर मामे आणि मावसभावंडांच्या ताटांकडे पाहिलं. सगळ्यांत छोटा- ३ वर्षांचा हर्षद- त्यानेही त्याच्या ताटलीतला खाऊ पूर्ण संपवला होता. इंद्रजीतला एकदम शरम वाटली. “मी उरलेला पास्ता सकाळी खाईन. टाकणार नाही. सॉरी आबा!” म्हणताना तो रडवेला झाला आणि आजोबांनी त्याच्या पाठीवर हात ठेवला.

अन्नाचा प्रवास जाणून घेण्यासाठी नेथन जेसप व मायकल बुकोवी यांचे ‘द ब्रेव्ह बनाना’ हे छोट्यांचे पुस्तक तुम्ही जरूर वाचा.

चित्र रंगवा.

अतिउंचावरचे पूल

ऐकावे ते नवलच!

दोस्तांनो, जगातील सर्वांत उंचावरील पूल चीनमध्ये बांधण्यात आला आहे. ‘हुआजांग ग्रँड कॅनियन ब्रिज’ असे त्याचे नाव आहे. जमिनीपासून ६२५ मीटर उंचीवर असलेला हा पूल चीनच्या गुझाओ प्रांतात बेपॅन नदीवर बांधण्यात आला आहे. आतापर्यंत ही दरी पार करण्यासाठी लागणारा वेळ होता जवळपास १ तास ते ७० मिनिटे. हा रस्ताही वळणावळणांचा होता. या पुलामुळे हा प्रवास केवळ १ मिनिटावर आणता येणार आहे. आहे ना नवल?... पुढच्या महिन्यात या पुलाचे उद्‌घाटन होणार आहे.

वजन
१०,०००
टनांपेक्षा जास्त

सर्वांत उंचावरील रेल्वेचा पूल भारतात

उंच-उंच पूल बांधण्यात जगात चीन पुढे आहे हे खरे आहे. पण आपल्या भारतातही उंचावरील पूल आहेत. जम्मू-काश्मीरमधील चिनाब नदीवर बांधलेला रेल्वेचा पूल हा जगातील सर्वांत उंचावरचा रेल्वे ब्रिज आहे.

जमिनीपासून उंची
११७८
(चिनाब नदीवर)

पुलाची एकूण लांबी
४३१४
(म्हणजेच १.३१ किलोमीटर्स)

पुलाचा प्रकार- ‘आर्च ब्रिज’ (म्हणजे गोलाकार अशा मजबूत रचनेवर बांधलेला पूल.)

पुलाचा प्रकार- ‘स्टील ट्रस सस्पेन्शन ब्रिज’ (‘स्टील ट्रस’ म्हणजे म्हणजे भक्कम अशी त्रिकोणी आकारांची पोलादी रचना असते. ती अतिशय मजबूत तारांवर तोलून बसवली जाते आणि पूल बांधला जातो.)

जमिनीपासून उंची
२०५०.५२ फूट

प्रवासाच्या वेळात घट- ६० ते ७० मिनिटांवरून १ मिनिटावर

? ३) ‘द ब्रेव्ह बनाना’ हे पुस्तक कोणी लिहिले?

✔ १) फॉरेन्सिक बॅलिस्टिक्स म्हणजे बंदूक, बंदुकीच्या गोळ्या, वेग यांचा अभ्यास करणारे शास्त्र.

विक्रमांची अजब दुनिया

दोस्तहो, विक्रमांची दुनिया अजब आणि अतर्क्य. चला तर, विक्रमांच्या पोतडीत या वेळी काय काय आहे ते बघूया.

‘सुपरहिट’ झाले विज्ञानविषयक व्याख्यान

दोस्तांनो, आपण नेहमी सिनेमा किंवा गाण्याचे कार्यक्रम ‘हाउसफुल्ल’ झाल्याच्या बातम्या ऐकतो. ‘कोल्डप्ले’ बॅण्डच्या भारतातील कार्यक्रमाची हजारो तिकिटे विकली गेली, वगैरे या बातम्या असतात. पण तुम्ही कधी एखादे विज्ञानविषयक व्याख्यान ‘सुपरहिट’ झाले, अशी बातमी ऐकलीय का?... इंग्लंडमधील प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ प्रोफेसर ब्रायन कॉक्स यांनी नुकताच हा विक्रम केला आहे. ते ‘हॉरिझॉन्स- अ ट्वेन्टी फर्स्ट सेंच्युरी स्पेस ऑडिसी टूर’ या नावाने गेली अडीच वर्षे जगभर व्याख्याने देत आहेत. ऑगस्ट २०२२ ते मे २०२५ या कालावधीत त्यांची तब्बल ३,६९,२९७ तिकिटे विकली गेली आहेत. हा जगातील सर्वांत जास्त तिकिटविक्री झालेला विज्ञानविषयक कार्यक्रम ठरला.



‘रुबिक्स क्यूब’ (पझल क्यूब) सोडवणे तुमच्यापैकी काही जणांना तरी नक्की जमत असेल. पण अमेरिकेतील चार विद्यार्थ्यांनी रुबिक क्यूब सोडवणारा रोबॉट बनवला आहे. या रोबॉटचे वैशिष्ट्य असे, की तो केवळ ०.१०३ सेकंदांत (म्हणजे १०३ मिलिसेकंदांत!) ‘३ बाय ३ बाय ३’चा रुबिक्स क्यूब बरोबर सोडवून दाखवतो. म्हणजे डोळ्यांची पापणी लवते न लवते, तोपर्यंत या रोबॉटने रुबिक्स क्यूब सोडवलेला असतो. हा रोबॉट बनवणारे मॅथ्यू पॅट्रोहे, जुनपे ओटा, एडन हर्ड आणि ॲलेक्स बेर्टा हे चौघे परड्यु विद्यापीठाच्या ‘एल्मोर फॅमिली स्कूल ऑफ इलेक्ट्रिकल ॲण्ड कॉम्प्यूटर इंजिनिअरिंग’चे विद्यार्थी आहेत. तुम्हीही मोठे होऊन छान अभ्यास करा आणि या चौघांसारखे मोठे मोठे शोध लावा!

‘गो-कार्ट’चा लांबलचक ट्रॅक

तुम्ही लहान मुलांसाठीच्या ‘थीम पार्क’मध्ये- म्हणजे मनोरंजन नगरीत गेला आहात का? अशा ठिकाणी विविध ‘राइड्स’ असतात. तिथे ‘गो-कार्ट’नामक एक खेळ असतो. ‘गो कार्ट’ म्हणजे लहान आकाराच्या- एकच माणूस बसेल अशा मोटारी असतात. आपण त्या ट्रॅकवर चालवायच्या असतात. जगातील सर्वांत लांब इनडोअर- ‘मल्टी लेव्हल’ (बहुमजली) गो कार्ट ट्रॅकचा मान अमेरिकेतल्या ‘आरएमपी रेस वे लॉंग आयलंड’ या ट्रॅकला मिळाला आहे. हा ट्रॅक १.०७ किलोमीटर लांब आहे. नुकतेच समारंभपूर्वक त्याचे उद्घाटन करण्यात आले. रिकी स्टेनहाउस या प्रसिद्ध रेस कार ड्रायव्हरने इथे प्रथम गो-कार्ट चालवायचा आनंद घेतला. लांबलचक ट्रॅकवर गो-कार्ट चालवायला भन्नाट मजा येत असेल ना?...

मांजराची लांब उडी!

एकीकडून दुसरीकडे झेप घेऊन उडी मारणे, हा मांजराची नैसर्गिक सवयच आहे. पण अमेरिकेतील एका मांजराच्या नावे सर्वांत लांब उडी मारण्याचा विक्रम जमा झालाय. अमेरिकेच्या टेक्सास राज्यातील डल्लासमध्ये ऑस्कर हे ८ वर्षांचे मांजर आपले मालक थिओडोर यांच्याबरोबर राहते. ऑस्कर ८ फूट ५ इंच इतकी लांब उडी मारू शकतो. ऑस्कर आधी एक भटके मांजर होते. तो जखमी आणि आजारी अवस्थेत थिओडोर यांच्याकडे आला. काही दिवसांत तो बरा झाला आणि त्याची मालकाबरोबरची मैत्री घट्ट झाली. थिओडोर त्याला वेगवेगळ्या ट्रिक्स शिकवतात आणि ऑस्कर त्या आनंदाने शिकतो. हे खरे तर जगावेगळेच आहे; कारण सगळीच मांजरे कुत्र्यांप्रमाणे वेगवेगळ्या करामती शिकायला प्रतिसाद देत नाहीत.

स्क्रीन टाइम

पोन्यो (२००८)

कशासाठी बघायचा चित्रपट?

- निसर्गाचा समतोल बिघडेल असे वागू नका. निसर्गाला जपले, तर तो तुम्हाला जपेल, हा या चित्रपटातला प्रमुख संदेश आहे.
- वरवरचे रूप महत्त्वाचे नसते. आतले गुण पहा!
- मैत्रीत एकमेकांवर विश्वास आणि माया हवी.

समुद्रकन्येची रूपक कथा!

दोस्तांनो, सध्या आपण ‘घिबली आर्ट’ या जपानी पद्धतीच्या ॲनिमेटेड चित्रशैलीत बनवलेले चित्रपट पाहतो आहोत. ‘स्टुडिओ घिबली’ आणि हायाको मियाझाकी यांनी बनवलेल्या ‘स्पिरिटेड अवे’ आणि ‘माय नेबर तोतोरो’ या चित्रपटांविषयी आपण जाणून घेतले आहेच. आज पाहूया या यादीतला तिसरा अतिशय सुंदर चित्रपट- ‘पोन्यो’. हा चित्रपटही खूप ‘गोग्गोड’ आणि गंमतशीर आहे!

चित्रपटाची गोष्ट

पोन्यो ही समुद्रात राहणारी मुलगी आहे. ती लाल रंगाचा फ्रॉक घालते आणि गोल्डफिश माशासारखी दिसते. तिचे बाबा म्हणजे फुजिमोटो नामक जादूगार. तेही समुद्रात राहात असतात. एक दिवस समुद्री जीवनाला कंटाळून पोन्यो बाहेर जाण्याची धडपड करते. पण ती एका काचेच्या बाटलीत अडकून बेशुद्ध पडते. सोसके नावाचा एक लहान मुलगा समुद्राच्या शेजारीच राहात असतो. खेळताना त्याला पाण्यात पोन्यो अडकलेली बाटली सापडते. तो तिला बाहेर काढून बादलीतल्या पाण्यात सोडतो आणि पोन्यो शुद्धीवर येऊन खेळू लागते. सोसके पोन्योला गोल्डफिश समजून तिला आपल्याबरोबर घेऊन जातो. पोन्योचे बाबा तिला शोधायचा प्रयत्न करतात, पण समुद्रात घाण व गाळ असल्यामुळे त्यांना वेगाने पोन्योला गाठता येत नाही. पोन्यो व सोसकेची मैत्री होते. पण तेव्हाच पोन्योचे बाबा समुद्रात भव्य लाटा निर्माण करून पोन्योला परत घेऊन जातात. सोसके बिचारा रडू लागतो. पोन्योचे बाबा तिला परत जमिनीवर जायचे नाही, असे खडसावतात. पण पोन्योच्या हातात जादू असते. जादूने ती खरीखुरी मुलगी होते. पण तिच्या प्रयत्नात समुद्रात मोठे वादळ येते. पोन्यो छोट्या मुलीच्या रूपात सोसकेला भेटते. सोसकेची आई पोन्योला हरवलेली मुलगी समजून तिची काळजी घेते. पोन्योची आई समुद्रातील देवी असते. ती पोन्योच्या बाबांना सांगते, की सोसकेने पोन्योचे रूप (मासा की मुलगी) न पाहता तिच्यावर माया केली, तरच पोन्यो मनुष्यरूपात राहू शकेल. खूप जादू वापरल्यामुळे पोन्यो थकते आणि मासारूपात जाते. पोन्योची आई सोसकेला विचारते, की ‘तू आताही पोन्योवर आधीइतकेच प्रेम करतोस का?’... छोटा सोसके याचे काय उत्तर देईल? पोन्यो जमिनीवर राहू शकेल का? याची उत्तरे या चित्रपटात आहेत.

चित्रपटाची वैशिष्ट्ये

मित्रांनो, ही एक रूपक कथा आहे. पोन्यो आपल्याला निसर्गावर माणसाचे प्रेम हवे, हे सांगते. हा चित्रपट लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आवडेल आणि एकत्र बसून पाहता येईल. यातल्या घिबली चित्रांसारखी सोपी चित्रे तुम्ही नक्की काढून पाहा.

माय रेसिपी

दोस्तांनो, काही रेसिपीज्‌ खूप सोप्या असतात; पण त्या इतक्या छान दिसतात, की बघणारा पाहताक्षणीच म्हणतो, ‘अरे व्वा!’
आज आपण क्रॅकर बिस्किटांपासून, पदार्थांची वेगवेगळी ‘कॉम्बिनेशन्स’ वापरून आकर्षक ‘क्रॅकर बोर्ड’ बनवूया. ही रेसिपी आकर्षक दिसतेच, पण चवीलाही छान लागते.

प्रयोग करा

या पदार्थामध्ये तुम्हाला प्रयोग करण्यासाठी खूप वाव आहे. तुमच्या आवडीचे कोणतेही वेगवेगळे ‘टॉपिंग्ज’ वापरून क्रॅकर बोर्ड सजवा.

क्रॅकर बोर्ड

साहित्य

- कोणतीही ‘क्रॅकर’ बिस्किटे (ही बिस्किटे जाडीला पातळ व आयताकृती असतात. त्यांना स्वतःची अशी फारशी चव नसते. बाजारात विविध ब्रॅंड्सचे ‘बिस्किट क्रॅकर्स’ मिळतात.)
- टॉपिंगसाठी- चीज स्प्रेड किंवा क्रीम चीज, चीज स्लाइस/ चीज क्यूब्ज, पीनट बटर/ चॉकलेट स्प्रेड, चेरी टोमॅटो/ साधा टोमॅटो, पुदिना/ बेसिलची पाने, अननस (ताजा/ डबाबंद अननस)/ सफरचंद, केळे.

कृती

१) क्रीम चीज ॲण्ड टोमॅटो क्रॅकर-
क्रॅकर बिस्किटावर चमच्याने थोडे क्रीम चीज किंवा चीज स्प्रेड पसरून लावा. चेरी टोमॅटोचे काप करा वा साधा टोमॅटो घेतल्यास त्याच्या चकत्या करून घ्या. पुदिना किंवा बेसिलची पाने स्वच्छ धुवून पाने खुडून घ्या. चीज लावलेल्या क्रॅकरवर टोमॅटो, पुदिना/बेसिलची पाने ठेवा. आवडत असल्यास ओरेगॅनो, चिली फ्लेक्स भुरभुरा.

२) फ्रूट ॲण्ड चीज क्रॅकर
क्रॅकर बिस्किटावर चीज स्लाइसचा किंवा पातळ कापलेल्या चीज क्यूबचा तुकडा ठेवा. त्यावर अननसाचे किंवा सफरचंदाचे काप ठेवा. ‘फ्रूट ॲण्ड चीज क्रॅकर’ तयार!

३) बनाना-स्प्रेड क्रॅकर
क्रॅकर बिस्किटावर पीनट बटर किंवा चॉकलेट स्प्रेड लावा. त्यावर केळ्याचे काप ठेवा. ‘बनाना-स्प्रेड क्रॅकर’ तयार!

काय काळजी घ्यावी?

टोमॅटो, सफरचंद, केळे चिरण्यासाठी सुरी वापरावी लागते. त्या वेळी मोठी माणसे जवळ असलेले चांगले.

? ४) जगात सर्वाधिक लांब उडी मारणाऱ्या मांजराचे नाव काय?

✓ ८) चंद्राला पृथ्वीभोवती एक फेरा पूर्ण करण्यास ३० दिवस लागतात.

पेटोपिया

मी उंच उंच!

जगातील सर्वांत उंच कुत्र्यांचा विषय निघाला की ‘ग्रेट डेन’ या प्रजातीचे नाव वारंवार ऐकायला मिळते. तुम्हाला आठवत असेल, तर आपण काहीच दिवसांपूर्वी ‘विक्रमांची दुनिया’ या सदरात सर्वांत उंच कुत्रा आणि सर्वांत पिटुकला कुत्र्याच्या भेटीची छानशी बातमी पाहिली होती. सध्या जगातला सर्वांत उंच कुत्रा आहे अमेरिकेतील ग्रेट डेन ‘रेजी’. रेजीची उंची आहे तब्बल ३ फूट ३ इंच! आपल्याकडेही कुत्रा पाळणाऱ्यांमध्ये ही प्रजाती लोकप्रिय आहे. शहरात अनेक ठिकाणी रस्त्यांवर फेरफटका मारताना एखादा ग्रेट डेन कुत्रा पाहायला मिळतोच. चला तर मग, आज या रुबाबदार कुत्र्याविषयी आणखी थोडे जाणून घेऊया.

असा झाला प्रजातीचा जन्म

जर्मनीमध्ये १८ व्या शतकात मोठमोठ्या ‘इस्टेटीं’ची- म्हणजे शेतांची राखणदारी करण्यासाठी ‘ग्रेट डेन’ ही कुत्र्याची प्रजाती वाढवली गेली. त्या अर्थाने ग्रेट डेन हा मानवनिर्मित कुत्रा आहे, असेच म्हणावे लागेल! कारण ग्रेड डेन अशी कोणती कुत्र्याची प्रजाती त्यापूर्वी निसर्गात आढळत नव्हती. ‘मॅस्टिफ’ ही कुत्र्याची एक दुसरी प्रजाती आहे. हे मॅस्टिफ कुत्रे आणि इतर काही बलदंड व चपळ कुत्र्यांचे ‘ब्रीडिंग’ करून त्यातून ‘ग्रेट डेन’ ही कुत्र्यांची नवी प्रजाती माणसांनी वाढवली. पूर्वी जर्मनीत जंगलाच्या जवळ असणाऱ्या शेतांमध्ये व बागांमध्ये रानडुकरांचा उपद्रव व्हायचा. या रानडुकरांना पळवून लावण्यासाठी वा त्यांची शिकार करण्यासाठी स्थानिक लोक ग्रेट डेन कुत्र्यांची मदत घ्यायचे.

सरासरी **उंची**

२.६ नर | २.५ मादी (आकडे फुटांमध्ये)

सरासरी **वजन**

७१.३ किलोग्रॅम
६३.५ किलोग्रॅम

सरासरी **आयुष्य : ७ ते १० वर्षे**

राजेशाही राहणी, शांत स्वभाव

‘ग्रेट डेन’चा उल्लेख करताना इंग्लिशमध्ये ‘जेंटल जायंट’ असे विशेषण वापरले जाते. ‘जेंटल जायंट’ म्हणजे, आकाराने, उंचीने खूप मोठा, तरीही ज्याची भीती वाटणार नाही असा- प्रेमळ आणि शांत! त्यामुळेच ग्रेट डेन प्रजातीचे आयुष्य जरी ७ ते १० वर्षे इतके कमी असले, तरी अनेक लोक ग्रेड डेन आनंदाने पाळतात. विशेषत: ज्यांच्याकडे भरपूर जागा आहे आणि ग्रेट डेनची बडदास्त ठेवण्याची आर्थिक तयारी आहे, अशी मंडळी! या कुत्र्यांचा आकारच एवढा मोठा असतो, की त्यांना मुबलक खायला लागते. त्यांची झोपण्याची जागा- बेड मोठा असावा लागतो. गाडीतून त्यांना कुठे न्यायचे असेल, तरी गाडीतही प्रशस्त जागा लागते. पण हे कुत्रे त्यांच्या मालकांना जीवसुद्धा तेवढाच लावतात. आकार मोठा असला, तरी ते विनाकारण रागीट किंवा दादागिरी करणारे नसतात.

लाळ गळण्याची समस्या!

मित्रांनो, तुम्ही पाहिले असेल, की अगदी छोट्या बाळांच्या तोंडातून खूपदा लाळ गळते. त्यामुळे बऱ्याचशा बाळांच्या गळ्याभोवती लाळेरे- म्हणजे ‘बिब’ बांधलेले असते! ग्रेड डेन या कुत्र्याचे या एका बाबतीत छोट्या बाळांशी खूपच साम्य आहे! ग्रेट डेनच्या जबड्याची रचना बघा कशी वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांचा जबडा, गाल, ओठ या ठिकाणी जास्तीची आणि सैलसर कातडी असते. त्यामुळे त्यांच्या तोंडात त्या ठिकाणी लाळ जमा होते आणि लाळ गळते! कुत्र्याला खेळायचे असेल, खूप उत्साही वाटत असेल, तेव्हा आणि खाताना लाळ जास्त प्रमाणात गळते. लहान बाळांसारखे त्यांना काही लाळेरे बांधता येत नाही! हो, पण ग्रेट डेनची खूपच लाळ गळत असेल, तर ते आरोग्य समस्यांचेही एक लक्षण असू शकते. त्यामुळे त्यांच्या मालकांना या गोष्टीकडे लक्ष द्यावे लागते. या कुत्र्यांचे दात स्वच्छ करणे हीदेखील मालकांची नियमित जबाबदारी असते.

खेळ खेळूयात

पकड पकड चेंडू पकड!

डॉ. अमृता देशपांडे-देशमुख

चेंडू झेलणे आणि फेकणे ही दोन महत्वाची कौशल्ये असून, त्यांचा वापर अनेक खेळांमध्ये केला जातो. ही कौशल्ये विकसित होण्यासाठीचा खेळ आपण पाहणार आहोत. यासाठी १ बॅट आणि काही चेंडू हे साहित्य लागणार आहे.

कृती

- या खेळासाठी खेळाडूंचे दोन गट करून घ्यावेत. एक गट बॅटिंग करणार आणि दुसरा गट चेंडू झेलण्यासाठी असेल.
- झेलणारे खेळाडू एका रांगेत उभे करावेत. पहिल्या खेळाडूने १० फुटांवरून चेंडू बॅटरकडे टाकून बाजूला काही पावले पळत जावे आणि तसेच उलटे पळत रांगेत शेवटी जावे. त्याच वेळी पुढील खेळाडूने चेंडू झेलून रांगेत यावे.
- यामध्ये ज्या खेळाडूकडून झेल सुटेल तो बाद होतो आणि बॅटरने चेंडू बाहेर मारला किंवा त्याच्याकडून चेंडू निसटला, तर बॅटर बाद होतो.
- त्यावरून गटांचे गुण मोजले जातात.

कौशल्ये

- या खेळात हाता-पायांची ताकद वाढते. तोल सुधारतो. झेलणे, फेकणे यामध्ये हाता-पायांमधील समन्वय वाढतो.
- अंतर, वेग यांचा योग्य अंदाज घेण्याचे मेंदूचे कौशल्य वाढीस लागते.
- क्रिकेट, फुटबॉल, बेसबॉल, हॉकी, हँडबॉल या खेळांसाठी पूरक असा हा खेळ आहे.

ॲप माझे

स्पेस शेफ



मनोरंजनाबरोबर नवी माहिती!

कोणासाठी?

- ९ वर्षांवरील कुणालाही मनोरंजनाबरोबर नवीन माहिती शिकण्यासाठी
- पालकांसाठी सोप्या व ‘हेल्थी’ परदेशी रेसिपींचे कलेक्शन

दोस्तांनो, वेगाने खेळायचे खेळ आपल्यापैकी बहुतेकांना आवडतातच! असाच एक वेगवान खेळायचा सोपा खेळ आहे ‘स्पेस शेफ’. पॉइंट्स जिंकल्यावर हा गेम आपल्याला विविध अन्नपदार्थांविषयी शास्त्रीय माहिती सांगतो. ‘गूगल प्लेस्टोअर’वरून तो मोफत डाउनलोड करता येईल.

गेममध्ये काय काय?

- हा गेम ‘लॉरेन्स हॉल ऑफ सायन्स- यूसी बर्कली’ यांनी तयार केला आहे. (या विशिष्ट नावाचे दुसरे गेम्सही आहेत. त्यामुळे डाऊनलोड करण्यापूर्वी गेमचे चिन्ह नीट पाहून घ्या.)
- खाण्यापिण्याच्या चांगल्या पदार्थांची मुलांना ओळख करून देणे असा या गेमचा उद्देश आहे. त्याचा ‘स्पेस’ म्हणजे अवकाशाशी काही संबंध नाही.
- हा गेम खेळणे सोपे आहे. आपल्याला समोर दाखवल्या जाणाऱ्या घटकांपैकी योग्य घटक ‘स्पेस शेफ’ला पटापट देऊन एकेक रेसिपी पूर्ण करायची आहे. यासाठी आपल्याला परदेशी पदार्थ माहिती असण्याची काहीही गरज नाही. हा वेगाचा खेळ आहे.
- आपण गेममध्ये पॉइंट्स मिळवल्यावर अन्नाशी संबंधित नवीन माहिती शिकायला मिळते. हा भाग रंजक व महत्त्वाचा आहे. उदा. स्ट्रॉबेरीसारख्या फळांमध्ये शेतीत फवारली जाणारी कीटकनाशके मोठ्या प्रमाणावर शोषली जातात. त्यामुळे खाताना स्ट्रॉबेरी नीट धुवून खावी इ.

पालकांसाठी काय?

- या गेममध्ये आरोग्याला चांगल्या रेसिपींचा स्वतंत्र खण आहे. हे पदार्थ परदेशी आहेत. परंतु हल्ली आपल्याकडेही परदेशी पदार्थ केले जातात; त्यामुळे पालकांना यातील काही हेल्थी रेसिपींचा उपयोग होऊ शकेल.
- उदा. बेक केलेले टोफू/ चिकन/ मासे, रोस्ट केलेले टोमॅटो/ गाजर, दही-काकडीचे सॅलड, बटाटा सूप, स्मूदी, ओट्स वगैरे.

PREPARING FOR EXAMS

Alchemize

Sharing Study Tips

Student 1 : How are you revising for the science exam?
Student 2 : I'm using flashcards for key concepts. It helps me memorize faster.
Student 1 : That's smart. I've been rereading the textbook, but it's taking too long.
Student 2 : Try the flashcards! I can share mine with you.

Dealing with Stress

Student 1 : I feel so overwhelmed with all the subjects.
Student 2 : Me too, but let's break it down. Focus on one subject at a time.
Student 1 : That's a good idea. Maybe I'll start with math today.
Student 2 : Great! And take short breaks; it really helps me stay focused.

Group Study

Student 1 : Let's divide the topics for history. I'll cover World War II, and you can handle the Independence Movement.
Student 2 : Sounds good. We can explain it to each other tomorrow.
Student 1 : Perfect! We'll cover more ground this way.

Last-Minute Review

Student 1 : Quick, what's the formula for calculating speed?
Student 2 : Speed equals distance divided by time.
Student 1 : Got it! Thanks. Any tricky questions you want me to ask?
Student 2 : Yeah, quiz me on Newton's Laws.

Encouraging Each Other

Student 1 : I'm so nervous. What if I forget everything during the exam?
Student 2 : You've studied well. Trust yourself, and you'll do great.
Student 1 : Thanks! I really needed to hear that.

Managing Time

Student 1 : I don't think I'll finish studying all the chapters tonight.
Student 2 : Don't try to do everything. Focus on the important topics first.
Student 1 : That's true. Which topics do you think are most likely to come in the math exam?
Student 2 : Probability and geometry are usually high-scoring. Start there, and we'll discuss the rest tomorrow.
Student 1 : Good idea! Let's make a quick schedule and stick to it.

ESSAY WRITING

How to Write an Expository Essay?

Last time, we learned about analytical essays. This time, we will explore how to write an expository essay, where your goal is to explain something clearly and simply.

An expository essay explains facts or ideas to the reader in a way that is easy to understand. It doesn't share opinions or try to convince the reader; instead, it focuses on giving clear and detailed information.

Steps to Write an Expository Essay

1. **Choose a Topic :** Pick a topic you know about and can explain, like "How rain is formed" or "Steps to make a kite."
2. **Do Some Research :** If needed, find extra information to make your explanation better and more complete.
3. **Write Your Introduction :** Start with a clear sentence that tells the reader what you'll explain.
4. **Organize Your Points :** Break down the topic into steps or parts, and explain each one in a new paragraph. Use simple and clear sentences.
5. **Add Examples :** Include examples or details to make your explanation easier to understand.
6. **Write a Conclusion :** End by summarizing what you explained and why it's interesting or important.

Example Topics :

How Rain is Formed : Explain the process of evaporation, condensation, and precipitation.

How to Make a Sandwich : List and explain the steps to make a simple sandwich.

Sample Sentence

"To make a sandwich, you first need to gather ingredients like bread, butter, and your favorite filling. Then, spread the butter and add the filling before putting the slices together."

An expository essay helps you explain something step by step so the reader understands it clearly!

Alphabet Express

शीतल करंदीकर

दोस्तांनो, पुढच्या प्रवाशाबद्दल उत्सुकतेनं बोलता बोलता 'Alphabet Express' त्या स्टेशनवर आलीसुद्धा. X गाडीत चढला. लगेच X ने आपला हात बरोबर आणलेल्या शिदोरीकडे नेला. "मी आणलेले शब्द काहीसे वेगळेच आहेत. तुम्हाला आवडतील की नाही, माहीत नाही!" असं म्हणाला. त्यावर सगळे एकसुरांत अगदी आपुलकीने म्हणाले, "नक्कीच आवडतील!" मग काय! X ने उत्साहाने त्याच्याकडचा एक एक शब्द मेजवानीमध्ये मांडायला सुरू केला. चला, आपणही यात सामील होऊया!

'X'शी दोस्ती!

१) X-ray = (उच्चार : एक्स-रे) = क्ष-किरण = The doctor advised an x-ray of the knee.

२) xerox = (झेरॉक्स) = शुष्क छाया मुद्रणप्रत (ग्रीक भाषेत याचा अर्थ 'dry writing' असा आहे) – आपल्याला अनुभव आहे की सर्वसामान्य संवादात मराठी शब्द न वापरता 'झेरॉक्स' काढणे असंच म्हटलं जातं. = The teacher asked for xerox copies of the papers.

३) xenon = (झेनॉन) = वास नसलेले एक वायुरूप द्रव्य = There was some presence of xenon felt in the air.

४) xylem = (झायलेम) = कोणत्याही वनस्पतीमध्ये जलवाहिन्या असतात- ज्या पाणी आणि क्षार मूळांपासून इतर भांगांकडे नेतात, त्यांना झायलेम म्हणतात = The students were shown a picture of the xylem.

५) x-factor = (एक्स-फॅक्टर) = एखाद्या व्यक्तिमधील किंवा वातावरणातील वर्णन न करता येण्यासारखी बाब = There was some x-factor about him that made everyone respect him.

६) xanthic = (झॅनथिक) = पिवळसर रंगाकडे झुकणारा = The xanthic shade of her dress was very soothing to the eyes.

७) xenagogue = (झेनागॉग) = ज्याला आपण टूर गाईड म्हणू शकतो = My friend soon turned out to be a xenagogue and began to give us a lot of information about the new place.

८) xenial = (झिनियल) = अनोळखी लोकांचा आदरातिथ्याने पाहुणचार करणारा = His xenial temperament made everyone comfortable.

९) xena = (झीना) = खंबीर, आत्मविश्वास असणारी स्त्री = The xena walked towards the stage and everyone had their eyes fixed on her.

१०) xenomania = (झिनोमेनिया) = परदेशी माणसं, वस्तू, प्रथा यांचे प्रचंड आकर्षण असणारी व्यक्ती = His xenomania was well-known to everyone and therefore they appointed him as the leader of their research team for the thesis.

११) xenophobia = (झिनोफोबिया) = परदेशी माणसं, वस्तू, प्रथा यांची खूप भीती असणारी व्यक्ति = His xenophobia kept him away for years from any kind of foreign tour.

१२) xylography = (झायलोग्रॅफी) = लाकडावर कोरीव काम करण्याची कला = The intricate xylography on the temple pillars was the centre of attraction of the place.

१३) X'mas = (एक्समस) = ख्रिसमस या सणाला असेही संबोधतात = We all enjoyed the X-mas celebration at school.

१४) xebec = (झेबेक) = शिडाच्या होडीचा एक प्रकार = They set off soon in a xebec and sailed far into the sea.

X ने आजच्या मेजवानीत वेगळ्याच स्वादाची भर घातली. आपण मात्र विचारत किंवा स्वादात हरवून जायला नको, बरं का! आपल्याला आपल्या गंमतपाठाच्या तयारीला लागायचं आहे. आज X चे आणखी शब्द शोधणं हे वाटतं तितकं सोपं नक्कीच नाहीये. चला लवकर आणि नवे शब्द शोधू.

MEENA'S OPEN CLASSROOM

In a bustling Indian city, there lived an unusual little girl named Meena. She was full of questions, ideas, and curiosity. But traditional schools didn't understand her. Teachers often scolded her for talking too much or wandering off in thought. One day, her parents decided to enroll her in a unique school run by Mr. Rao, an old man with a big smile and even bigger ideas.

Mr. Rao's school wasn't like others. Instead of classrooms, it had open courtyards under mango trees. Students sat on colorful mats, and every lesson was a story. When Meena arrived, she hesitated. "Where are the desks and blackboards?" she asked. Mr. Rao chuckled, "Learning isn't confined to walls, Meena. Here, we explore!"

In Mr. Rao's school, every day was an adventure. Once, during a science class, Mr. Rao asked the children to identify sounds around them. As the students listened, Meena noticed the rhythmic tap of a carpenter's hammer nearby. Intrigued, she visited the carpenter after class and learned about making furniture. The next day, she proudly showed her classmates a miniature wooden stool she had made.

But not everything went smoothly. One day, while planting saplings during an activity, Meena accidentally broke a pot. She feared Mr. Rao would scold her, but instead, he smiled and said, "Mistakes are lessons in disguise."

Over time, Meena thrived. She found joy in learning through experience. History lessons were field trips, math was taught with games, and stories sparked her creativity. Her parents noticed the change - Meena was now more confident and eager to share what she learned.

Years later, Meena became a teacher, starting a school much like Mr. Rao's, ensuring other children like her would always find a place to grow.



MAGIC WORD PUZZLE

W	I	Z	A	R	D	O	R	Q	H	M
H	O	G	W	A	R	T	S	U	A	U
O	L	O	R	D	S	N	I	I	T	G
M	A	G	I	C	C	U	A	D	P	G
S	W	O	R	D	H	D	Z	D	H	L
B	S	M	A	P	O	I	K	I	O	E
D	E	A	T	H	O	A	A	T	E	D
E	R	I	N	G	L	D	B	C	N	O
N	I	M	B	U	S	E	A	H	I	W
A	W	A	N	D	T	M	N	L	X	L
G	R	Y	F	F	I	N	D	O	R	K

GRAMMAR BITE

Contronyms

Contronyms (or auto-antonyms) are fascinating words that have two opposite meanings! The meaning depends on how they're used in a sentence, making them both tricky and intriguing.

Examples :

1. 'Dust'

To remove dust : "She dusted the shelves to clean them."

To add a fine layer : "He dusted the cake with sugar."

2. 'Bolt'

To secure : "Bolt the door before you leave."

To run away : "The horse bolted from the stable."

3. 'Left'

To remain : "Only two pieces of cake are left."

To depart : "He left the party early."

4. 'Overlook'

To supervise : "She will overlook the project."

To miss noticing : "He overlooked the mistake in the report."

Contronyms are a great example of how context shapes meaning in English—making it both challenging and exciting!

सुभाषित

**आमकुम्भ इवाम्भस्थो जीर्यमाण: सदा घट: ।
योगानलेन संदह्य घटशुद्धिं समाचरेत् ।।**

पाण्यात ठेवलेले कच्चे मडके ज्याप्रमाणे विरघळते, त्या प्रमाणे योगरहित शरीर शक्तिहीन होत जाते. म्हणून घटरूपी शरीर योगाभ्यासरूपी अग्नीने भाजून पक्के करावे.

संस्कार

आनंददायी शनिवार

सुविचार

प्रश्न विचारणे ही ज्ञानाच्या शोधाची पहिली पायरी आहे.

गीता श्लोक

**आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ।
योगारूढस्य तस्यैव शम: कारणमुच्यते ।।।।**

योगावर आरूढ होण्याची इच्छा करणाऱ्या मननशील व्यक्तिला योगाची प्राप्ती होण्यासाठी निष्काम कर्म करणे हाच हेतू सांगितला आहे आणि योगारूढ झाल्यावर त्या योगारूढ व्यक्तीचा जो सर्व संकल्पांचा अभाव असतो, तोच कल्याणाला कारण सांगितला आहे.

दिनविशेष

२३ मे

१९९९ : भारताचा ग्रॅण्डमास्टर विश्वनाथन आनंद याने सलग दुसऱ्या वर्षी 'चेस ऑस्कर' पुरस्कार पटकावला.

२४ मे

२०१७ : भारताची ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती पी. व्ही. सिंधू हिची जागतिक बॅडमिंटन महासंघाच्या खेळाडू आयोगावर सर्वाधिक मतांनी निवड.

२८ मे

१८८३ : महान क्रांतिकारक, प्रतिभासंपन्न कवी, लेखक, वक्ते स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म.

बोधकथा

प्रशांत सरुडकर



माकडाची फजिती

एका शहराजवळच्या गर्द वनराईत एक व्यक्ती मंदिर बांधत होती. जवळच्या शहरातील मजूर तेथे दिवसभर काम करत असत. मंदिरासाठी लागणारे सर्व साहित्य तिथे जवळपास पडले असायचे. मंदिराच्या खांबासाठी एक भले मोठे लाकूड कापण्याचे काम सुरू होते. करवतीच्या साह्याने सुतार ते लाकूड कापत होते. दुपार झाली. सर्व जण जेवायला गेले. सुताराने एक लाकूड अर्धवट कापलेल्या लाकडामध्ये पाचर म्हणून ठोकून ठेवले व तो जेवण व विश्रांतीसाठी गेला.

वनराईच्या आसपास अनेक वानरे राहत होती. त्यातील एक वानर अतिशय उपद्व्यापी व उचापती होते. ते मित्रांना घेऊन बांधकामाच्या परिसरात आले व कामगारांनी तयार केलेल्या वस्तू घेऊन खेळू लागले. जवळच्या झाडावर असलेल्या एका वयस्कर वानराने त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. इतर सर्व वानरे तेथून दुसरीकडे निघून गेली, पण हे उचापती वानर तिथेच थांबले. तेवढ्यात त्याचे लक्ष लाकडाच्या ओंडक्याकडे गेले. त्यामध्ये ठोकलेली पाचर त्याने पाहिली. ही पाचर काढण्याचा विचार त्याच्या डोक्यात आला. वानर त्या ओंडक्यावर चढले व पाचर काढण्याचा प्रयत्न करू लागले, पण पाचर अतिशय घट्ट बसवली होती. ती काही निघेना. वानरही दोन्ही हाताने शक्ती लावून मोठ्या ताकदीने पाचर काढू लागले. नेमकी याच वेळी त्याची शेपटी कापलेल्या लाकडाच्या ओंडक्यामध्ये अडकली, हे त्या वानराच्या लक्षातच आले नाही. हिसके देऊन पाचर काढताना एकदम ती निघाली आणि त्या लाकडाच्या फटीत वानराची शेपटी अडकून पडली. ते चित्कार करू लागले.

थोड्या वेळात सुतारांची जेवण झाल्यानंतर ते आले. त्यांनी त्याची शेपटी सोडवली. उचापतीपणा त्या वानराला फार महागात पडला.

गुड मॅनर्स

फुलांनाही असतो जीव!

दोस्तांनो, साने गुरुजी लिखित 'श्यामची आई' हे पुस्तक तुम्ही वाचले आहे का? त्यातील 'मुकी फुले' ही गोष्ट तुम्हाला आठवते का? छोटा श्याम आपल्याला जास्त फुले मिळावीत म्हणून कळ्याच तोडून आणतो. त्यामुळे आई त्याला रागवते आणि सांगते की, कळ्यांनादेखील जीव असतो. त्यांना जर फूल होण्याआधीच झाडावरून तोडलं, तर त्यांना त्रास होणार नाही का? त्यांची पूर्ण वाढ झालेली नसल्याने त्यातून छान फूल फुलणार नाही. यासाठी झाडावरून फुले तोडताना आपण कळ्याच तोडत नाही ना, हा विचार करायला हवा.

मित्र-मैत्रिणींनो, कळ्या न तोडण्याबरोबरच फुलांना जपणं हेदेखील तेवढंच महत्त्वाचं आहे. लग्नात, धार्मिक कार्यक्रमात, समारंभात पुष्पगुच्छ दिले जातात किंवा फुले वाटली जातात किंवा फुलांची उधळणही केली जाते. यामध्ये फुले पायदळी जातात, कोमेजतात, त्यांना कसेही वापरले जाते. हे अजिबातच 'गुड मॅनर्स'मध्ये येत नाही बरं का! तुम्हाला कोणी फूल दिल्यास ते देवाला वाहा, शर्टवर लावा, फुलदाणीत ठेवा किंवा एखाद्या भांड्यात पाणी घेऊन त्यात ठेवा. १-२ दिवसांत ते फूल कोमेजले म्हणजेच त्याचे निर्माल्य झाले की, शक्यतो खत होण्यासाठी झाडांच्या मुळाशी जमिनीत टाका.

हल्ली काही समारंभांमध्ये पुष्पगुच्छ देण्याऐवजी पुस्तके, रोपे, छोटी भेटवस्तू देण्याची पद्धत आली आहे. त्याचंही आपण स्वागत करायला हवं. त्यामुळे फुलांची नासधूस होत नाही आणि आलेल्या पाहुण्यांनाही एखादी उपयुक्त वस्तू मिळते. शिवाय रोप दिल्यास नवीन झाड लावलं जातं.

अवकाश

सदानंद होशिंग

राशिविचार

मित्रांनो, आतापर्यंत आपण नक्षत्र आणि ग्रहांचा विचार केला. त्याचबरोबर ध्रुवतारा आणि सप्तर्षींविषयी जाणून घेतले. आता आपण एका वेगळ्या खगोलीय तारकासमूहांविषयी समजावून घेऊया. आपण बऱ्याच वेळा राशींविषयी ऐकले आहे. आता आपण पाहणार आहोत याच राशींची माहिती.



राशी हा केवळ ज्योतिषाचा भाग नाही. खगोलीय तारकासमूहांचा संच म्हणजे राशी होय. सूर्य ज्या मार्गावरून जाताना आपणास दिसतो त्यास क्रांतिवृत्त असे म्हणतात. वास्तविक पाहता सूर्य एकाच जागी आहे, पण पृथ्वी त्याच्या भोवती फिरते, म्हणून आपणास सूर्य फिरताना भासतो. हे क्रांतिवृत्त लंबवर्तुळाकार आहे. त्या ३६०० चे १२ समान भाग केले आहेत. प्रत्येक भाग हा ३०० चा आहे. या प्रत्येक भागात आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे नक्षत्रे येतात. १२ भागात प्रत्येकी २.१ अंश नक्षत्र येते. त्यालाच राशी असे म्हणतात.

याप्रकारे अवकाशात झालेल्या १२ भागांना विशिष्ट नावे देण्यात आली आहेत. या प्रत्येक राशीला विशिष्ट वर्ण, रंग, स्वामित्व, तत्त्व, इ. असते. चंद्र आणि पृथ्वीच्या भ्रमणातून ते जेव्हा विशिष्ट नक्षत्रातून जातात, त्या वेळी ते एका राशीतूनही भ्रमण करत असतात.

चंद्राला पृथ्वीभोवती एक फेरा पूर्ण करण्यास ३० दिवस लागतात. त्यावेळी तो महिनाभरात या १२ राशीतून फिरत असतो. त्यामुळे तो एका राशीत सर्वसाधारणपणे २.५ दिवस असतो. या अडीच दिवसात तो २.१ नक्षत्रातूनही फिरत असतो. एखाद्या विशिष्ट दिवशी चंद्र ज्या राशीत असतो, तीच त्या दिवसाची रास मानली जाते.

उत्थित एकपादशिरासन

योग जीवन

मनाली देव

उत्थित एकपादशिरासन हे तोलात्मक आसन आहे. या आसनामध्ये हातांच्या तळव्यांवर संपूर्ण शरीराचे वजन तोलले जाते. एकपादशिरासनाचा योग्य सराव झाल्यानंतर उत्थित एकपादशिरासनचा सराव सुरू करावा.

असे करावे आसन

- प्रथम ताठ बसावे. नंतर एक पाय मानेत घालून एकपादशिरासन करावे.
- त्यानंतर दोन्ही हातांच्या मदतीने थोडेसे उभे राहून दुसरा पाय सरळ करावा.
- आता दोन्ही हातांवर संपूर्ण शरीराचे वजन तोलून दुसरा पाय सरळ ताठ वर उचलून जमिनीला समांतर करावा. छायाचित्रात दाखवल्याप्रमाणे आसन करण्याचा प्रयत्न करावा. जेवढा वेळ शक्य आहे तेवढा वेळ संपूर्ण शरीराचे वजन हातावर तोलावावे.
- आसन स्थितीमध्ये स्थिर राहावे. श्वसन संथ सुरू ठेवावे.
- आसन सोडताना सावकाश सोडावे व दुसऱ्या पायाने हीच स्थिती करावी.

लाभ

- या आसनाच्या सरावाने हाताची, मनगटाची ताकद वाढते. पोटातील इंद्रिये-अवयवांवर दाब आल्याने त्यांची कार्यक्षमता वाढते. एकाग्रता वाढते.

काळजी :

- हे तोलात्मक आसन असल्यामुळे मार्गदर्शनाखाली व सावकाश करावे.

आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी

वाचू आनंदे

प्रत्येकाला लहान असताना गोष्ट सांगणारी एक तरी आजी किंवा आजोबा भेटतातच! तसे तर आई, बाबा आणि अगदी शाळेतल्या शिक्षकांनीही आपल्याला गोष्टी सांगितलेल्या असतात. तरीही आजी-आजोबांच्या गोष्टी जास्त हव्याहव्याशा का वाटतात, याचे कारण म्हणजे त्या गोष्टींमागे त्यांचा स्वत:चा जीवनाचा अधिक वर्षांचा समृद्ध अनुभव असतो. मित्रांनो, तुमची पिढी आहे 'जेन अल्फा'! तुमचे पालक असतील 'मिलेनियल्स' आणि आजी-आजोबा असतात 'जनरेशन एक्स'. पण या नुसत्या वेगळ्या पिढ्या नाहीयेत! आजी-आजोबांच्या आणि तुमच्या एकूणच जगण्यात खूप फरक आहे, विचारांत फरक आहे. तो या कथांमध्येही आला आहे. पण जगण्यात फरक झाला, तरी माणसाने कसे वागावे, याचे आदर्श काही खूप वेगळे नसतात. या पुस्तकातील गोष्टी उत्तराखंडमध्ये घडतात. चांगली नीतिमूल्ये जीवनात कशी जोपासावी, हे सांगणाऱ्या या कथा तितक्याच रंजक आहेत. सुधा मूर्ती यांनी 'Grandpa"s Bag of Stories' हे मूळचे पुस्तक लिहिले असून लीना सोहोनी यांनी त्याचा अनुवाद केला आहे. तुम्ही या गोष्टी जरूर वाचा! या गोष्टींच्या अनुषंगाने तुम्हाला तुमच्या परिचयातल्या आजी-आजोबांशी त्यांच्या आयुष्याबद्दल छान गप्पाही मारता येतील.



? ८) चंद्राला पृथ्वीभोवती एक फेरा पूर्ण करण्यास किती वेळ लागतो?

✔ २) शालिमार बाग, अनंतनाग ही ठिकाणे काश्मीरमध्ये आहेत.

एकाग्रता वाढवणारी BooSnoo!

कार्टूनची सफर

अरविंद रेणापूरकर



दोस्तांनो, तुम्ही आमिर खानचा 'तारें जमीन पर' हा चित्रपट पाहिला असेल. (नसेल पाहिला तर नक्की पाहा!) या चित्रपटात 'डिस्लेक्सिया' ही समस्या असलेल्या इशान अवस्थी या मुलाने छान शिकावे, यासाठी त्याचे शिक्षक- राम शंकर निकुंभ हे सतत प्रयत्न करत असतात. प्रत्यक्षातही काही मुलांना आकलनाशी संबंधित विविध समस्या असतात. अशा खास मुलांचा मानसिक विकास घडवण्यासाठी विविध माध्यमांची मदत घेतली जाते. अशी एक ॲनिमेटेड मालिका आहे 'बुस्नू' (BooSnoo).

एकाग्रता वाढवण्यासाठी

प्रत्यक्ष शिकवण्याबरोबर खेळणी, चित्रे, व्हिडिओ आदींच्या माध्यमातूनही लहान मुलांची आकलनक्षमता वाढवण्यासाठी आणि त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देण्यासाठी प्रयत्न केले जातात. 'बुस्नू' ही ॲनिमेटेड मालिका मुलांची एकाग्रता वाढवण्याबरोबरच विशेष मुलांची मानसिक सक्षमता वाढवण्यासाठी उपयुक्त ठरली आहे. खासकरून 'ऑटिझम' आणि 'अटेन्शन डेफिसिट हायपरॲक्टिव्हिटी डिसॉर्डर' (एडीएचडी) असलेल्या मुलांना शांत राहून लक्ष देण्याची क्षमता वाढवायला त्याचा उपयोग होत आहे. ही एक ब्रिटिश मालिका आहे. ज्युलिअन बॅशफोर्ड यांच्या संकल्पनेतून ती साकारली गेली. २०२३ मध्ये 'स्काय किड्स' या ब्रिटिश चॅनलवर ती प्रथम प्रसारित झाली. या मालिकेत एक लाल रंगाचा चेंडू विविध यांत्रिक आणि कलात्मक संरचनांमधून प्रवास करतो. ते बघताना आपल्याला शांत वाटते आणि आनंदही मिळतो. चेंडूच्या या प्रवासादरम्यान मुलांना विविध आकार, रंग, गती आणि आवाजांचा अनुभव मिळतो. मालिकेचा प्रत्येक भाग सुमारे ६ ते ७ मिनिटांचा असतो. काही भाग यापेक्षा मोठेही आहेत. प्रत्येक भागात लाल चेंडूच्या प्रवासाद्वारे आपण कला, संगीत आणि यांत्रिकीच्या अद्भुत जगात जातो.

विशिष्ट हेतूने तयार केलेली मालिका

ही मालिका विशेषतः 'न्यूरोडायव्हर्स' मुलांसाठी ('ऑटिझम'सारख्या विशिष्ट समस्या असलेली मुले) तयार करण्यात आली आहे. बहुतेक कार्टून मालिकांमध्ये भरपूर गडबड-गोंधळ असतो. भरपूर संवाद असतात, मोठा आवाज आणि 'कॉमेंट्री'सुद्धा असते. या गोंधळातून थोडा वेळ शांततेचा अनुभव घेण्यासाठी ही मालिका आहे. पण केवळ समस्या असलेली मुलेच नाही, तर सगळ्यांनाच ही मालिका पाहता येईल. सध्या ही मालिका इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे आणि ती यूट्यूबवरही आहे.

चेंडूची सर्कस : 'बुस्नू' मालिकेतील प्रत्येक भाग एक विशिष्ट संकल्पनेवर आधारित आहे. साधारण ६ मिनिटांच्या एका भागात हा लाल चेंडू सर्कसच्या जगात प्रवेश करतो. तो विविध सर्कसकलांच्या माध्यमातून प्रवास करत जातो. तो चेंडूच एक सर्कसपटू होतो. हे पाहताना आपल्याला खूप छान वाटते.

ज्ञान-विज्ञान

डॉ. तन्मयी रानडे

'फॉरेन्सिक' म्हणजे काय?

मित्र-मैत्रिणींनो, गुन्हेगारांच्या जगतावर किंवा गुन्ह्याचा शोध कसा लागला? यावर आधारित अनेक चित्रपट, वेबसीरिज येतात. ते तुम्ही बघितले असेलच. या वेळी त्यामध्ये पोलिसांबरोबर लॅबकोट घातलेले, गुन्ह्याच्या जागेवरून रक्ताचे, बोटांचे, ठसे गोळा करणारे, बंदुकीच्या गोळ्या जमा करणारे काही लोक आपल्याला दिसतात. हे सर्व लोक कोण असतात? तर, हे लोक 'फॉरेन्सिक डिपार्टमेंट'मध्ये काम करणारे शास्त्रज्ञ किंवा त्यांचे सहकारी असतात. आज जाणून घेऊ या वेगळ्या क्षेत्राबद्दल!

फॉरेन्सिक सायन्स

फॉरेन्सिक सायन्स म्हणजे कायदेशीर बाबींमध्ये, त्यातही विशेषतः गुन्हेगारी आणि दिवाणी तपासात वैज्ञानिक तत्त्वे आणि पद्धतींचा वापर करणे. यामध्ये गुन्ह्यांच्या घटना आणि इतर ठिकाणांवरील पुराव्यांचे विश्लेषण करून, त्यावर प्रयोग करून, त्यातून समोर येणारे निष्कर्ष न्यायालयात सादर करता येतील असे पुरावे गोळा करणे, या गोष्टींचा समावेश आहे.

विविध विषयांचा समावेश

'फॉरेन्सिक सायन्स'मध्ये रसायनशास्त्र, जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, संगणकविज्ञान अशा विविध विषयांचा समावेश होतो. गुन्ह्याचा तपास करताना कायद्याची अंमलबजावणी आणि यंत्रणेला मदत करण्यासाठी फॉरेन्सिक शास्त्रज्ञ विविध वैज्ञानिक तत्त्वांचा वापर करतात. ते एखाद्या गुन्ह्याच्या शोध लावण्याच्या प्रक्रियेत मदत करतात.

१ स्थळाचा तपास आणि पुरावे

फॉरेन्सिक शास्त्रज्ञ गुन्हा जिथे झाला तिथे जातात आणि तेथील विविध पुरावे योग्य पद्धतीने गोळा करून त्याचे नीट जतन करतात. त्यात विविध वस्तू असतात. उदा. टेबलवरचा काचेचा ग्लास, एखादे शस्त्र, वही, पेन, इत्यादी. तेथील पुराव्यांचे छायाचित्रण किंवा स्केचिंग करून कायदेशीर पद्धतीने ते एकत्र करतात.

२ प्रयोगशाळेतील विश्लेषण

शास्त्रज्ञ हे सर्व पुरावे प्रयोगशाळांमध्ये आणतात आणि त्यावर काम सुरू होते. यामध्ये रक्त, केस, लाळ इत्यादी नमुन्यांतून डीएनएचे विश्लेषण, बोटांच्या ठशांचे विश्लेषण इत्यादी कामे सुरू होतात.

३ पुराव्यांचा निष्कर्ष व अहवाल देणे

शास्त्रज्ञ पुराव्याचे महत्त्व ओळखून ते कोणत्या घटनेशी किंवा प्रकरणाशी कसे संबंधित आहे हे ठरवण्यासाठी विश्लेषण करतात आणि त्यावर आपला तपशीलवार अहवाल सादर करतात.

४ साक्ष

शास्त्रज्ञ अनेकदा न्यायालयात तज्ज्ञ व्यक्ती म्हणून साक्ष देतात. पुराव्यांचा अर्थ, त्यांचा निष्कर्ष आणि महत्त्व हे न्यायाधीशांना सांगतात. ते न्यायालयाला वैज्ञानिक पुरावे आणि खटल्याशी असलेला त्यांचा संबंध समजून घेण्यास मदत करतात.

'फॉरेन्सिक' पुराव्यांची काही उदाहरणे

- रक्त, लाळ, केस आणि इतर स्रोतांमधून घेतलेले डीएनए नमुने.
- बोटांचे ठसे.
- बंदुकीच्या गोळ्या किंवा इतर शस्त्र.
- तंतू, काचेचे तुकडे, रंगाचे तुकडे
- औषधे, तेल आणि अत्तरासारखे इतर पदार्थ.
- संगणक, फोन आणि इतर उपकरणांमधून मिळणारे डिजिटल पुरावे.

फॉरेन्सिक बॅलिस्टिक्स

फॉरेन्सिक बॅलिस्टिक्स हेसुद्धा एक महत्त्वाचे शास्त्र आहे. यात बंदूक, बंदुकीच्या गोळ्या, त्यांचा वेग, बंदुकीची अंतर्गत प्रक्रिया ह्याचा अभ्यास केला जातो आणि त्याचा उपयोग गुन्ह्याचा तपास करण्यासाठी केला जातो. सायबर फॉरेन्सिक्स, ज्याला संगणक फॉरेन्सिक्स किंवा डिजिटल फॉरेन्सिक्स असेही म्हणतात. यामध्ये सायबर गुन्ह्यांशी संबंधित डिजिटल पुरावे गोळा करणे, जतन करणे, विश्लेषण करणे आणि सादर करणे ही प्रक्रिया केली जाते. यात संगणक, लॅपटॉप, मोबाइल यातील सॉफ्टवेअर, स्टोरेज मीडियाचा समावेश होतो.

तुम्हाला व्हायचंय फॉरेन्सिक शास्त्रज्ञ?

फॉरेन्सिक सायन्स हे एक व्यापक क्षेत्र आहे ज्यामध्ये अनेक स्पेशलायझेशन आहेत. या क्षेत्रात काम करण्यासाठी फॉरेन्सिक सायन्स, केमिस्ट्री, बायोलॉजी किंवा विज्ञान क्षेत्रातील पदवी हा पाया आहे. त्यानंतर डीएनए विश्लेषण, बॅलिस्टिक आणि बंदुका, फॉरेन्सिक केमिस्ट्री, फॉरेन्सिक पॅथॉलॉजी, फिंगरप्रिंट विश्लेषण यासारखा विषय घेऊन तुम्ही त्यात विशेष प्रशिक्षण घेऊ शकता. त्याशिवाय या विषयात पीएचडीही करता येते.

? १) फॉरेन्सिक बॅलिस्टिक्स म्हणजे काय?

✔ ५) कुत्र्यांची 'ग्रेट डेन' प्रजाती सर्वांत प्रथम जर्मनीमध्ये वाढवली गेली.





संख्येनुसार मार्ग दाखवा.



खालील चित्रांतील नऊ फरक ओळखा.

खालील चित्रामध्ये किती चौकोन आहेत?





Find the odd one out

ओरिगामीची खुर्ची

हस्त कला

मंदार वैद्य

गेल्या अंकामध्ये आपण ओरिगामीचे टेबल बनवायला शिकलो. ते तुम्ही सर्वांनी बनवले असेल अशी आशा आहे. समजा एखाद्या घडीपाशी येऊन तुम्ही अडला असाल, तर घरातील वडीलधारी मंडळी अथवा शिक्षकांचे मार्गदर्शन घ्या. लक्षात घ्या, तुम्हाला अडचण येते कारण तुम्ही प्रयत्न करताय. त्यामुळे निराश होऊ नका! या वेळी आपण खुर्ची बनवायला शिकणार आहोत. परंपरागत ओरिगामीची टेबल आणि खुर्ची सोप्या पद्धतीने आकृतिबद्ध करण्याचं श्रेय ज्येष्ठ जपानी ओरिगामी कलाकार फुमिआकी शिंगू यांचं आहे. त्यांनी केलेल्या ओरिगामीच्या भरीव कार्याबद्दल आपण कृतज्ञता व्यक्त करूया.

कृती १



चौरस कागद घ्या. समोरासमोरील बाजू एकमेकांना जुळवून मध्यभागी घड्या घाला व पुन्हा उलगडा.

कृती २



चौरसाची चारही टोके कागदाच्या मध्यभागी आणून घड्या घाला.

कृती ३



हातामध्ये तयार झालेल्या चौरसाची चारही टोके पाठीमागील बाजूस मध्यभागी जुळवून घड्या घाला.

कृती ४



हातामध्ये तयार झालेल्या चौरसाची चारही टोके पुन्हा मध्यभागी आणून घड्या घाला.

कृती ५



हातातील कलाकृती पलटून घ्या.

कृती ६



(ही कृती करण्यापूर्वी 'कृती सात'मधील आकृतीचे आधी निरीक्षण करा.) तुमच्या हातात असलेल्या कलाकृतीमध्ये चार कप्पे दिसतील. दर्शवलेल्या बाणांप्रमाणे ते कप्पे बाहेरच्या दिशेने उघडा.

कृती ८



चार दिशेला तयार झालेले चारही भाग व्यवस्थित पहा. यांपैकी तीन भागांची खालच्या दिशेने घडी घालायची आहे आणि एका भागाची घडी वरच्या दिशेने घालायची आहे.

कृती ३



तुम्ही तयार केलेली छानशी खुर्ची आता तयार झाली आहे. ती तुम्ही पाहा व इतरांनादेखील दाखवा. आता एक टेबल आणि चार खुर्च्या असा एक संच बनवा.

दोस्तांनो, निबंध लेखन हा एक महत्त्वाचा भाग आहे. आपल्याला शाळेत भाषांच्या पेपरमध्ये निबंध लिहावा लागतो. त्यात एखादा नवीन विषय आला की, आपली तारांबळ उडते. याचं कारण वाचन, पाठांतर, उदाहरणांची माहिती, लेखनकला याकडे आपण फारसे लक्ष देत नाही. मात्र, नियमित वाचन ठेवले आणि सराव केला, तर निबंध लिहिण्यातला आनंद तुम्हाला आपोआप कळेल! नवनवीन कल्पना डोक्यात येतील आणि त्या कागदावर उतरवताना तुम्हाला खूप मज्जाही येईल. यासाठी या लेखातील मुद्दे काळजीपूर्वक वाचा आणि त्यांचा सराव करा.

निबंध लेखनात व्हा हुशार!

१ निबंध लेखन करताना लेखनाचे नियम व्यवस्थित लक्षात ठेवावेत. त्या नियमांनुसार लेखन करणे आवश्यक असते.

२ निबंध लेखनामध्ये व्याकरण हे खूप महत्त्वाचे असते आणि अर्थपूर्ण लेखनाला खूप महत्त्व दिले जाते. अर्थहीन लेखन उपयोगी ठरत नाही.

३ निबंधाचे वेगवेगळे परिच्छेद पाडून त्यामध्ये सुरुवात, मध्य भाग, तसेच अंत भाग यांमध्ये विषय विभागावा.

४ निबंध लिहिताना आपल्याला योग्य तिथे वर्णन करावे लागते. त्यासाठी विषयाचा गाभा पक्का करावा. योग्य तिथे वर्णन करावे.

५ निबंधाचे वेगवेगळे प्रकार असतात. त्यात वैचारिक, कल्पनाविस्तार, विज्ञानविषयक, ललित, वाद-विवादात्मक निबंध, वर्णनात्मक निबंध, कथनात्मक निबंध, प्रेरक निबंध असे विविध प्रकार पडतात.

६ लेखकाने आपल्या विचारांनुसार शब्दांद्वारे चित्र रंगवले पाहिजे. तसेच वर्णन करण्यासाठी विशिष्ट अशी पद्धत वापरली जाते- त्याला शैली म्हणतात. त्यामुळे वाचकांना लेखन अधिक भावते.

७ परीक्षेत निबंध लिहिण्यासाठी वेगवेगळे पर्याय दिलेले असतात. त्यांपैकी कुठल्या विषयाचे तुम्हाला जास्त ज्ञान, सराव आहे तो विषय निवडा. त्यामुळे लेखन करणे सोपे जाते.

८ कोणत्या परिच्छेदामध्ये कोणते मुद्दे लिहायचे आहेत, त्याची मांडणी अगोदरच करा. त्यानुसार लेखनाला सुरुवात करा. त्यामुळे गोंधळ होत नाही.

९ ज्या विषयाबद्दल निबंध लिहायचा आहे, त्याची चांगल्या प्रकारे माहिती मिळवा. जेवढी माहिती अधिक, तेवढा निबंध अधिक छान होतो. पुरेसा मोठा आणि उपयुक्तही होतो.

१० निबंधासाठी विविध विषयांवरील भरपूर माहिती मिळवण्यासाठी अवांतर वाचन करा. म्हणी, सुभाषिते, कवितांच्या ओळी, श्लोक, इंग्रजी वाक्ये एखाद्या वहीत टिपून ठेवा.

११ निबंधलेखनातून टप्प्याटप्प्याने, तसेच प्रसंगानुसार मांडणी करत एखाद्या अंतिम विचारापर्यंत जाण्याचा प्रयत्न करा.

१२ विषयानुरूप छान सुरूवात व शेवट करा. त्यासाठी म्हणी, सुभाषिते, कवितांच्या ओळी, श्लोक वगैरे वापरा.

१३ निबंध वाढवण्यासाठी त्यात काहीही लिहू नका. संदर्भ नसलेल्या गोष्टींचा उल्लेख करणे टाळा.

१४ योग्य तिथे विरामचिन्हांचा वापर करा. त्यासाठी मराठी शुद्धलेखनाचे नियम पक्के करा.

१५ निबंध लेखन करण्यासाठी भरपूर वाचा, ऐका, लिहा आणि व्याकरणाचाही अभ्यास करा.

निबंध म्हणजे काय?

निबंध हा आधुनिक गद्यलेखनाचा एक प्रकार आहे. निबंध म्हणजे बांधणे असा अर्थ विचारात घेतला जातो आणि बंधन या अर्थाने वापरला जातो. निबंध म्हणजे नियमांनी बद्ध असणारा, अभिप्रेत लांबीचा, तरीही संक्षिप्त, नीटपणे मांडलेल्या विचारांनी युक्त असा मुद्देसुद लेख. एखाद्या विषयासंबंधी संगतवार केलेले लेखन म्हणजे निबंध. निबंध हा साधारणपणे लेखकाचा स्वतःचा युक्तिवाद करणारा लेखनाचा भाग असतो.

गरज

अगदी लहानपणापासून म्हणजे इयत्ता तिसरी-चौथीपासून वेगवेगळ्या विषयांवर निबंधलेखन करण्यास सांगितले जाते. हल्ली विविध स्पर्धा परीक्षांमध्येही आवर्जून निबंधलेखनाचा समावेश केलेला असतो. एखादा विषय सर्व पैलूंसह मांडण्याची हातोटी अनेक ठिकाणी कामाला येते. निबंध हा आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा असतो. एकाच केंद्राभोवती फिरणारी व ठरावीक शब्दात मांडलेली रचना म्हणजे निबंध!

- **उर्मिला लंबे- पवार,** सहशिक्षिका,
श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

• Registered • Date of Publication : शुक्रवार, २३ मे २०२५ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.

'टी-२०' क्रिकेट सामन्यात भारताच्या शुबमन गिल आणि साई सुदर्शन या खेळाडूंनी नुकताच एक ऐतिहासिक विक्रम केला. १८ मे २०२५ रोजी झालेल्या 'गुजरात टायटन्स' विरुद्ध 'दिल्ली कॅपिटल्स' या 'आयपीएल' सामन्यात या दोघांनी २०५ धावांची नाबाद भागीदारी केली. 'आयपीएल'मध्ये दोन फलंदाजांनी नाबाद भागीदारीत केलेल्या या सर्वाधिक धावा आहेत. या निमित्ताने तमिळनाडूच्या, डाव्या हाताने फलंदाजी करणाऱ्या साई सुदर्शन या चपळ खेळाडूचे खूप कौतुक झाले. प्रामुख्याने कोरोनानंतरच्या काळात नावारूपास आलेल्या तडफदार साई सुदर्शनविषयी...

साई सुदर्शन

जन्म : 15 ऑक्टोबर 2001, चेन्नई • वय- 23 वर्षे

साई सुदर्शन

एकदिवसीय (आंतरराष्ट्रीय)

- ३ सामने
- १२७ धावा
- ६२ सर्वोच्च धावसंख्या
- २ अर्धशतक

टी-20

- ५७ सामने
- २१२९ धावा
- १०८ सर्वोच्च धावसंख्या
- २ शतक
- १३ अर्धशतक

आयपीएल

- ३७ सामने
- १६५१ धावा
- १०८ सर्वोच्च धावसंख्या
- २ शतक
- ११ अर्धशतक

पदार्पण

एकदिवसीय (आंतरराष्ट्रीय)
दक्षिण आफ्रिका विरुद्ध भारत, जोहान्सबर्ग
१७ डिसेंबर २०२३

टी-२० (आंतरराष्ट्रीय)
झिंबाब्वे विरुद्ध भारत, हरारे
७ जुलै २०२४

टी- २०
तमिळनाडू विरुद्ध महाराष्ट्र, लखनौ
४ नोव्हेंबर, २०२१

> गेल्या वर्षी काही सामन्यांत मी थोडा सावकाश खेळलो होतो. पण फलंदाजीत मला स्वतःला आणखी पुढे न्यावे लागेल, हे माझ्या लक्षात आले. माझ्या खेळात मी काही बदल केलेले नाहीत, पण आता त्यात मनाची स्पष्टता आली आहे. मी जसा आणखी सामने खेळतोय, तशी मानसिकदृष्ट्याही खेळात सुधारणा होतेय.
> - साई सुदर्शन

सामन्याच्या सुरुवातीला उत्तम खेळीचा लौकिक

साई सुदर्शन भारतीय क्रिकेटविश्वातील वेगाने प्रगती केलेला तारा आहे. तो फलंदाजी करताना सावधपणे, पण उकृष्ट खेळतो; निष्कारण धोका पत्करत नाही. उगाच आक्रमक शॉट्स मारत नाही. कुठे आक्रमक फलंदाजी करायची याचे गणित त्याने आत्मसात केले आहे. त्याच्या खेळाचे वर्णन 'सेफ अॅण्ड स्मार्ट' असे केले जाते. या त्याच्या वैशिष्ट्यांमुळे सामन्याच्या सुरूवातीला खेळणाऱ्या फलंदाजांपैकी एक उत्तम फलंदाज म्हणून त्याने कमी वयातच लौकिक मिळवला आहे. त्याच्या खेळातील सातत्यामुळे तो भविष्यात उज्ज्वल कामगिरी करेल, याची खात्री क्रिकेटमधील जाणकारांना वाटते.